जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ८६१ दिनांक - ०९/१२/२०२३

सायबर पोलीस स्टेशन पुणे, शहर

### फेडेक्स कुरियर सर्व्हिसेस मधून बोलत असल्याचे सांगून तैवान येथे पाठविलेल्या कुरियर बॉक्समध्ये मॉफेड्रेन (एमडी) अंमली पदार्थ सापडल्याचे सांगून फसवणुक करणा-या आरोपीस दिल्ली येथून केली अटक.

महिला फिर्यादी यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करून फोनवर बोलणारी व्यक्ती ही फेडेक्स कुरियर सर्व्हिसेस मधून बोलत असल्याचे सांगून फिर्यादी यांनी तैवान येथे पाठविलेल्या कुरियर बॉक्समध्ये १४० ग्रॅम मॉफेड्रेन (एमडी) हे अंमली पदार्थ सापडले असून बतावणी करून सदरचे पार्सल कस्टम ऑफिस मुंबई येथे अडविण्यात आले आहे. परंतु फिर्यादी यांना असे कोणतेही पार्सल पाठविले नाही असे सांगितल्याने फोनद्वारे संपर्क करणा-या इसमाने फिर्यादी यांचे आधार कार्डचा गैरवापर केला असून त्याचा शोध घेणे कामी फिर्यादी यांना सायबर क्राईम मुंबई येथून अजयकुमार व डीसीपी स्वामी बोलत असल्याची बतावणी करून स्काईप आयडीवर सायबर पोलीस असा लोगो लावुन त्याद्वारे फिर्यादी यांचा विश्वास संपादन फिर्यादी यांची वैयक्तिक माहिती प्राप्त करून घेतली. फिर्यादी यांचे आधार कार्डचा गैरवापर कोठून झाला, फिर्यादी यांचे बँक खात्यांचे व्हेरिफिकेशन व कस्टम मध्ये सापडलेले पार्सल क्लिअर करण्यासाठी फिर्यादी यांची ०३ लाख रूपयांचा फसवणुक केली असल्याने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.रजि.नं. ८२/२०२३, भा.द.वि. ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६सी, ६६डी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यामध्ये फिर्यादी यांचेशी संपर्क करण्याकरिता वापरलेला स्काईप आयडी – live:.cid.252894a4223762d8, मोबाईल क्रमांक ९६१०६७५८३,९६९७३८९५० व फिर्यादी यांनी पैसे भरण्यासाठी वापरण्यात आलेले बँक खाती आयसीआयसीआय बँक खाते क्रमांक १५९७०५००१८०८ व १६१५०५५२०४९४ यांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी नामे **नरेश जैन उर्फ सुरेशभाई देसाई यास सासवड, पुणे येथून अटक करण्यात आली.** सदर आरोपीकडे केले तपासामध्ये तो बँक खाते उघडून त्याचे चेकबुक, एटीएम कार्ड, नेट बँकींग पासवर्ड आरोपी नामे **अजहर अतीक खान** यास तो रहात असलेल्या भुरूच, गुजरात येथे रेल्वेने पाठवित असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी गुजरात, दिल्ली व उत्तर प्रदेश येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील एक पथक दिल्ली व उत्तर प्रदेश येथे आरोपींचा शोध घेणेकामी पाठविण्यात आले. सदर ठिकाणी जाऊन आरोपींचा शोध घेतला असता सदर गुन्ह्यातील आरोपी यास सायबर पोलीस स्टेशन, शहादरा यांनी अटक केली असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे अजहर अतीक खान यास प्रोडक्शन वॉरंट अन्वये ताब्यात घेऊन त्यास दि. ०८/१२/२०२३ रोजी अटक करून त्यास मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दि. १३/१२/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे.

**अशा प्रकारे कोणाची फसवणुक झाली असल्यास सायबर पोलीस स्टेशन पुणे, शहर येथे संपर्क करण्याचे आव्हान करण्यात येत आहे.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री. रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री.आर. एन. राजे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मिनल सुपे-पाटील, पोलीस उप निरीक्षक संदिप कदम, तुषार भोसले, पोलीस अंमलदार संदेश कर्णे, राजकुमार जाबा, नवनाथ जाधव, शाहरूख शेख, निलेश लांडगे, नितीन चांदणे, ज्योती दिवाणे या पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली आहे.